पुढिल उलटतपास श्री पांडे वकीलांमार्फत शपथेवर पुन्हा सुरु

जुना खसरा क्र. १२३/१ची वेगळी आराजी मला सांगता येणार नाही काण तिची व खसरा क्र १२२/२ ची आराजी एकत्रितरीत्या नमुद आहे. रेहेन्यु रेकॉर्डमध्ये जुन्या खसरा क्र. २३/१ ची आराजी ०.७२ हे.आर किंवा डेसीमल मध्ये आढळुन आली आहे. अधिकार अभिलेख पाहीला असता त्यामध्ये या मिळकतीची आराजी ०.७२ एकरमध्ये दिसुन येत आहे. १९८२-८३ पासुन जेव्हा एकत्रिकरण पध्दती आंमलात आली तेव्हापासुन जमीनी या हेक्टर आर मध्ये मोजण्यात येउ लागल्या. त्याच्या आधी ती एकर व डेसीमल मध्य्ये असत. मी पी १फॉर्म म्हणजेच बंदोबस्त, खसरा आज रोजी आला नाही. जमीनीचा जो काही रेकॉर्ड तयार होतो त्याचा आधार म्हणजे पी-१ फॉर्म मी १९११-१२ चा बंदोबस्ताचा नकाशा आणला आहे. १९१२-१३ मध्ये खसरा क्र. १२२ व १२३ हे वेगवेगळे नंबर होते. बंदोबस्त खस-यामध्ये १२२ व १२३ आराजी ही वेगवेगळी आहे. हे म्हणणे खरे आहे की १२२,१२३,१२४ च्या उत्तरेला गावठाण्याची सीमा लागुन आहे. या गावठाण्याबददलचा रेकॉर्ड माझ्याकडे नाही. सर्व्हे क्र १२१ व १२२ च्या उत्तरेस एक पक्की सडक आहे. हे म्हणणे खरे आहे की पटवारी म्हणुन आम्हाला अतिक्रमण सिध्द करावयाचे व हटविण्याचे अधिकार नाहीत. कोणतेही जमीनीवरील अतिक्रमण हे भुमीलेख कार्यालयाच्या मोजणी आधारेच ठरु शकते. १९१२ ते १९१३ पासुन ते १९५२-१९५३ या कालावधीत जुना सर्व्हे क्र १२२ व १२३ हे कसे विभागले गेले याचा रेकॉर्ड माझ्याकडे नाही. १९६४ च्या आधी जुना सर्व्हे क्र १२३ॅ१ हा महादेव छापरा यांच्या नावे होता. असे कधी झाले नाही की जुना खसरा क्र १२३१ चा फक्त सर्व्हे क्र १८९ झाला. दि. १०.९.२०१५ रोजी प्रकाशच्या नावे सर्व्हे क्र १८९ चा फेरफार लागला. सर्व्हे क्र १८९ चे उत्तरेकडील गावठाण हे १०० वषापिक्षा अधिक वर्ष जुने आहे. प्रतिवादी क्र १ व २ यांनी सर्व्हे क्र १८ वर अतिक्रमण केले आहे किंवा नाही हे मी सांगु शकत नाही. सर्व्हे क्र. १८९ ला लागुनच प्रतिवादी क्र १ व २ ची जुने घरे असल्याबाबत मी सांगु शकत नाही.

फेरतपास नाही.

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वाक्षरी | स्वाक्षरी |
| **(व्ही.बी.कांबळे)** | **(व्ही.बी.कांबळे)** |
| **सह. दि न्या. क. स्तर** | **सह. दि न्या. क. स्तर** |
| **कळमेश्वर** | **कळमेश्वर** |

**दि.२.११.२०१८**